# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

## २९) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.०८.०७.२०२५

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (०२/०७/२०२५ ते ०८/०७/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०९/०७/२०२५ ते १३/०७/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | दिनांक | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| ६९.० | १०५.० | १०४.७ | ५५.० | ६१.९ | १६३.३ | ३१.७ | पाऊस (मिमी) | १५ | २४ | १४ | ९ | ८ |
| २४.० | २३.५ | २४.० | २४.० | २३.५ | २३.५ | २४.० | कमाल तापमान (अं.से.) | २८ | २८ | ३० | ३० | ३१ |
| २३.० | २२.५ | २२.५ | २३.० | २२.५ | २१.९ | २२.६ | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २३ | २३ | २३ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ९८ | ९८ | ९८ | ९६ | ९७ | ९८ | ९७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९५ | ९२ | ९१ | ९४ | ९६ |
| ९८ | ९७ | ९६ | ९७ | ९९ | ९६ | ९५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ९२ | ९१ | ८९ | ९१ | ९१ |
| ९.० | ८.४ | ८.८ | ९.५ | ८.७ | ८.१ | ८.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १३.५ | १३.७ | १५.५ | १६.२ | १७.७ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश**<br><br>**हवामान सतर्कता / इशारा:** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात दि. ०९ ते १३ जुलै २०२५ दरम्यान हलका ते मध्यम पावसाची शक्यता आहे. आकाश पुढील पाच दिवस ढगाळ राहील. तसेच कमाल तापमान २८-३१ डिग्री सें. व किमान तापमान २२-२३ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग १३-१७ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>**हवामानाचा अंदाज आणि चेतावणी लक्षात घेता नाशिक जिल्हाच्या घाट क्षेत्रातील एक दोन ठिकाणी दि. ०९ जुलै २०२५ रोजी (ऑरेंज अलर्ट) मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच दि. ०८ जुलै २०२५ रोजी (येलो अलर्ट) घाट क्षेत्रातील काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. नाशिक जिल्हात तुरळक ठिकाणी दि. ०८ जुलै २०२५ रोजी (येलो अलर्ट) मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, हलका ते मध्यम पाऊस व सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रतितास वेग) वाहण्याची शक्यता परिस्थीच्या अनुषंगाने कृषी क्षेत्रावर पडणाऱ्या प्रभावा आधारित अंदाज (०८.०७.२०२५ रोजी आर एम सी मुंबईव्दारे जारी केलेल्या जिल्हास्तरीय अंदाज आणि चेतावणीवर आधारित).** |
| **सामान्य सल्ला** | | पेरणी केलेल्या क्षेत्रात नांगे भरावीत.<br>ज्या ठिकाणी लवकर पेरणी झाली असेल त्या ठिकाणी शेत तणमुक्त ठेवावे.<br>खरीप हंगामातील भाजीपाला पिकाचे लागवडीसाठी रान बांधणी करावी. लागवडीचे वेळी शेणखताचा वापर करावा. रासायनिक खत मात्रेच्या ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीचे वेळी द्यावे.<br>वांगी व मिरची पिकाचे सहा आठवडे कालावधीचे रोपे लागवडीसाठी वापरावे.<br>पेरणी करताना बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी बियाणे पेरणीपूर्वी बियाण्यास बीजप्रक्रिया करावी.<br>खरीप भात रोपवाटिका, मका, सोयाबीन, बाजरी, मुग व कापूस पिकात पाणी साचले असल्यास त्वरित बाहेर काढणे गरजेचे आहे. पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. त्याकरिता पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य पध्दतीने चर काढावेत. पाणी साचून राहिल्यामुळे मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून येईल.<br>खरीप पिकांच्या पेरणीसाठी घरचे बियाणे वापरावयाचे असल्यास बियाणेची उगवण क्षमता तपासावी.<br>जिवाणु संवर्धक पाकीट सावलीत, थंड जागेत ठेवावे. बियाण्यास बुरशीनाशक अथवा किटकनाशक लावावयाचे असल्यास ती अगोदर लावावीत व त्यानंतर जिवाणु संवर्धक बियाण्यास लावावे.<br>मान्सून तसेच पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता नासिक जिल्ह्यात पेरणी योग्य पाऊस पडलेल्या ठिकाणी जसे पश्चिम घाट विभाग (इगतपुरी, त्र्यंबकेश्वर) व उपपर्वतीय विभाग (पेठ, सुरगाणा व नाशिकचा काही पश्चिम भाग) नागली, वरई पिकांची रोपवाटिकेत पेरणी सुरु ठेवावी. तसेच पूर्वेकडील अवर्षण प्रवण व मैदानी विभाग जसे (सिन्नर, देवळा, येवला, पूर्व नाशिक, चांदवड, निफाड, कळवण व दिंडोरी) ठिकाणी समाधानकारक पाऊस झालेला आहे म्हणून खरीप पिकांची पेरणी सुरु ठेवावी. |
| **संदेश** | | **मुसळधार पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता भात, नागली व वरई पिकांच्या रोपवाटिका, नवीन लावलेलि फळबाग व भाजीपाला पिकातून जास्तीचे पाणी काढून टाकण्याची व्यवस्था करावी.** |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोपवाटिका** | पेरणी केलेल्या भात शेतातून जास्तीचे पाणी काढण्याची सोय करावी व रहू पद्धतीने पेरणी केलेल्या भात पिकाच्या हळव्या जातींची २१ ते २५, निम गरव्या जातींची २३-२७, व गरव्या जातींची २५-३० दिवसांनी रोपांची पुनर्लागवड करावी.<br>पुनर्लागवड पद्धतीमध्ये सुधारित जातीच्या वाणांचे बियाणे ३५ ते ४० किलो प्रति हेक्टरी वापरावे तसेच संकरीत जातीसाठी प्रति हेक्टरी २० किलो बियाणे वापरावे.<br>रोपवाटीकेतील तण नियंत्रणासाठी १५ मिली ऑक्झीफ्लुरोफेन २३.५ टक्के ई.सी. १० लिटर पाण्यात पेरणीनंतर दोन ते तीन दिवसात फवारावे अथवा ब्युटाक्लोर ५० ई.सी १.५ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी फवारण्यात यावे.<br>रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा ५०० ग्रॅम नत्र खत द्यावे.<br>पीक संरक्षण<br>रोपवाटिकेतील वाफ्यात खोडकिडीचे कामगंध सापळे प्रति हेक्टरी पाच या प्रमाणात लावावेत.<br>रोपवाटिकेत वाफ्यात बियाणे टाकतेवेळी किंवा पेरणीनंतर १५ दिवसांनी दाणेदार क्लोरोपायरीफॉस १० टक्के (१० कि. ग्रॅ.) किंवा क्विनालफॉस ५ टक्के (१५ कि. ग्रॅ. ) प्रति हेक्टर या प्रमाणात जमिनीत मिसळावे.<br>खेकड्यांच्या बिळाशेजारी विषारी आमिष ठेवून खेकड्यांचे नियंत्रण करता येते यासाठी एसिफेट ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी (७५ ग्रॅ.) घेऊन १ कि. ग्रॅ. शिजवलेल्या भातामध्ये मिसळावे. या अमिषाचे १०० लहान – लहान गोळे करून खेकड्यांच्या बिळात टाकावेत.<br>(पावसाचा अंदाज घेऊनच वरील सर्व कामे करावीत) |
| **खरीप नाचणी** | **रोपवाटिका** | पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता शेतक-यांनी नागली पिकाची रोपवाटिका ८ दिवसांच्या अंतराने २ टप्प्यात तयार करावी.<br>पेरणी योग्य पाऊस पडलेल्या ठिकाणी ( जुलै चा दुसरा पंधरवडा पर्यंत ) खरीप हंगामासाठी रोपवाटिकेसाठी बियाण्याची पेरणी गादीवाफ्यावर सुरु ठेवावी.<br>बीजप्रक्रिया: बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रतिकिलो बियाण्यास ३ ते ४ ग्रॅम थायरम चोळावे. तसेच स्फुरद विरघळविणारे जिवाणू संवर्धक २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणास चोळावे.<br>रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा १ किलो युरिया खत द्यावे. एक एकर क्षेत्र रोप पुनार्लागनीकरीत २-३ गुंठे क्षेत्रावरील रोपवाटिका पुरेशी होते. (पावसाचा अंदाज घेऊनच वरील सर्व कामे करावीत) |
| **वरई** | **रोपवाटिका** | पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता शेतक-यांनी वरई पिकांची रोपवाटिका ८ दिवसांच्या अंतराने २ टप्प्यात तयार करावी.<br>पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता शेतकरी बांधवाना सल्ला देण्यात येतो कि वरई पिकाचे बियाणे गादीवाफ्यावर पेरणी ( जुलै चा दुसरा पंधरवडा पर्यंत) सुरु ठेवावी व बियाणे ओळीत पेरावे.<br>वरी/वरई पिकाची लागवड पेरणी, टोकण आणि रोप लागण पद्धतीने करण्यात येते.<br>वरईच्या एक किलो बियाण्यास ३ ते ४ ग्रॅम थायरम भुकटी लावावी. प्रति किलो बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम अझोस्पिरीलम ब्रासिलेन्स आणि ॲस्परजिलस अवोमोरी या जीवाणू संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. या बीजप्रक्रियेमुळे १० ते १५ % उत्पादनात वाढ होते. (पावसाचा अंदाज घेऊनच वरील सर्व कामे करावीत) |
| **खुरासणी** | **पेरणी** | घाट क्षेत्र तसेच उपपर्वतीय विभागात झालेल्या समाधानकारक पाऊस व पावसाचा अंदाजलक्ष्यात घेता खरीप हंगामात खुरासणी पिकाची पेरणी (१५ जुलै पर्यंत ) सुरु ठेवावी. ४-५ किलो प्रति हेक्टरी (बियाण्याच्या आकाराची वाळू घेऊन बियाण्यात १:३ या प्रमाणात मिसळून पेरणी करावी). ३० x १० सें.मी. (दोन ओळीतील अंतर ३० सें. मी. ठेऊन नांगराच्या मागे बी टाकून अगर तिफन / पाभरीने पेरणी करावी.<br>(पावसाचा अंदाज घेऊनच वरील सर्व कामे करावीत) |
| **बाजरी** | **पेरणी** | जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पाऊस व पावसाचा अंदाजलक्ष्यात घेता शिफारशीप्रमाणे रासायनिक खताची मात्रा देऊन तसेच जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करून पिकाच्या अंतरानुसार खरीप हंगामात बाजरीची १५ जुलै पर्यंत पूर्ण करावी.<br>खरीप हंगामात पेरणी सरी-वरंबा (थेंब थेंब संचय पद्धत) किंवा सपाट वाफे पद्धतीने करावी. पेरणी २ ते ३ सें.मी. पेक्षा जास्त खोलीवर करू नये. पेरणीचे अंतर कोरडवाहू क्षेत्रात दोन ओळीत ४५ सें.मी आणि दोन रोपामध्ये १५ सें.मी. अंतर ठेवावे, नियमित पावसाच्या ठिकाणी अथवा पाण्याची सोय असेल तेथे ३० X १५ सें.मी. अंतरावर पेरणी करावी.त्याकरिता बियाणे प्रमाण ३-४ किलो प्रती हेक्टरी वापरावे.<br>पेरणीपूर्वी बियाण्यास बीजप्रक्रिया करावी |
| **मका** | **पेरणी** | जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पाऊस व पावसाचा अंदाजलक्ष्यात घेता खरीप हंगामात मक्याची पेरणी १५ जुलै पर्यंत पूर्ण करावी.<br>खरीप हंगामात पेरणी सपाट वाफ्यांमध्ये करावी. पेरणीचे अंतर उशिरा व मध्यम कालावधी असणाऱ्या जातींसाठी ७५ x २० सें.मी तर लवकर पक्व होणाऱ्या जातींसाठी ६० x २० सें.मी ठेवावे. पेरणी टोकण पद्धतीने ४ ते ५ सें.मी खोलीवर करावी.<br>ॲट्राटॉप ५० टक्के हेक्टरी २.५ किलो पेरणी संपताच जमिनीवर फवारावे. (पावसाची उघडीप असताना फवारणी करावी)<br>मका पिकाची पेरणी टोकन पद्धतीने करावी त्याकरिता बियाणे प्रमाण १५-२० किलो प्रती हेक्टरी वापरावे. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| **सोयाबीन** | पेरणी | जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पाऊस व पावसाचा अंदाजलक्ष्यात घेता वापश्यावर (६५ ते १०० मी.मी. पाऊस) बीजप्रक्रिया करून सोयाबीन पिकाची पेरणी जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण करावी. कारण पेरणी जसजशी उशिरा होत जाईल त्यप्रमाणे उत्पादनात मोठी घट होते. पेरणीचे अंतर दोन ओळीत ४५ सें.मी. व दोन रोपातील अंतर ५ सें.मी. अशा प्रकारे करावे. पेरणी करताना बियाणे ४ सें. मी. पेक्षा खोल पडणार नाही याची काळजी घ्यावी.<br>आंतरपीक पद्धती<br>मध्यम ते भारी जमिनीत सोयाबीन आणि तूर या पिकांच्या ओळींचे प्रमाण ३:१ किंवा ४:२ असे ठेवावे. उशिरा पेरणीसाठी सुद्धा ही पद्धत उपयुक्त व फायदेशीर आहे. सर्वसाधारणपणे या आंतरपीक पद्धतीपासून निव्वळ तुरीच्या तुलनेत प्रति एकर अधिक उत्पन्न मिळते. |
| **भुईमुग** | पेरणी | जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पाऊस व पावसाचा अंदाजलक्ष्यात घेता खरीप हंगामात भुईमुग पिकाची पेरणी बीजप्रक्रिया करून भुईमुग पिकाची पेरणी (१५ जून ते १५ जुलै दरम्यान) सुरु ठेवावी.<br>खरीप हंगामात पाभरीने अथवा टोकण पद्धतीने पेरणी करावी. पेरणी अंतर दोन ओळीत ३० सें.मी आणि दोन रोपामध्ये १० सें.मी. अंतर ठेवावे.<br>बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. |
| **द्राक्षे** | | ओलांड्यावर मुळे तयार होणे<br>पावसाळी परिस्थितीत भारी जमिनीमध्ये वाफसा मिळणे शक्य नाही. त्याचा विपरीत परिणाम वेलीच्या मुळांच्या वाढीवर दिसून येईल. अशावेळी बोद खोदून पाहील्यास मुळे काळी पडलेली दिसून येतात. मुळाचा शेंडा काळा पडून सडल्याप्रमाणे दिसून येतो. यामुळे वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचाली व्यवस्थित होणार नाहीत. परिणामी शेंडा पूर्णपणे थांबलेला दिसेल. पाने पिवळी पडतील. काहीवेळा पानगळ होतानाही दिसून येईल.<br>बऱ्याचदा आपण खते व पाणी वेलीला दिले नसले तरी ती वेल जमिनीत उपलब्ध घटकांचा वापर करून वाढ करून घेण्याचा प्रयत्न करते. त्याचप्रमाणे जमिनीतील मुळे कार्यक्षम नसल्याच्या परिस्थितीतही वेल आपला बचाव करण्यासाठी वेलीच्या काडी, ओलांडा, खोडांवरील भागांवर मुळे तयार करते. जमिनीत जोपर्यंत पाणी साचलेले आहे, तोपर्यंत वेलीवर तयार झालेली ही मुळे कार्य करून आपली गरज पूर्ण करते. जमीन वाफश्यात आल्यावर पुन्हा बोदात थोडे खोदून मुळे तपासल्यास पांढरी मुळे तयार होताना दिसतील.<br>एरियल मुळांचे फारसे विपरीत परिणाम दिसत नाहीत. मात्र वरील मुळे सुकणे व जमिनीतील मुळे तयार होण्यातील कालावधी जास्त राहिल्यास घडाच्या विकासात किंवा काडीमध्ये अन्नद्रव्य साठविण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. ही समस्या कमी करण्यासाठी भारी जमीन असलेल्या किंवा पाणी साचून राहणाऱ्या बागेत काडी परिपक्वतेच्या कालावधीत दोन ओळींमध्ये नांगराने एक छोटी चारी घेतल्यास बोद किंवा मुळाच्या कक्षेतील पाणी वेळीच निघून जाईल. वाफसा लवकर येईल. ही पाणी साचण्याची स्थिती टाळण्यासाठी द्राक्ष लागवडीपूर्वीच बागेला दोन ते तीन टक्के उतार देण्याची शिफारस आहे. |
| **डाळिंब** | | मृग बहर (कीड व्यवस्थापन)<br>नवीन पालवी फुटण्याची अवस्था<br>एकरी २४ नीळे व पिवळे चिकट सापळे बागेत नागमोडी पद्धतीने झाडाच्या उंचीच्या १५ सें.मी खाली लावावेत.<br>पहिली फवारणी- रसशोषक किडींसाठी, ॲझाडिरेक्टिन (१०,००० पीपीएम) ३ मिली किंवा करंज तेल ३ मि.ली किंवा वरील दोन्ही एकत्रितपणे प्रत्येकी ३ मि.ली. अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मि.ली प्रतिलिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी. (पावसाची उघडीप असताना फवारणी करावी)<br>दुसरी फवारणी- ७ ते १० दिवसांनी रसशोषक किडींसाठी, सायअँट्रानीलीप्रोल (१०.२६ ओडी) १.८ मि.ली. किंवा थायमिथोक्साम (२५ डब्ल्यूजी) ०.५ ग्रॅम अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मि.ली. प्रतिलिटर पाणी प्रमाणे करावी.<br>फुलधारणा अवस्था<br>रसशोषक किडींसाठी, स्पिनेटोरम (११.७ एससी) ०.४ मि.ली. किंवा स्पिनोसॅड (४५ एससी) ०.३ मि.ली. अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मिली प्रतिलिटर पाणी प्रमाणे फवारावे. (पावसाची उघडीप असताना फवारणी करावी)<br>फळधारणा अवस्था<br>रसशोषक कीड व फळ पोखरणाऱ्या अळीसाठी, सायअँट्रानीलीप्रोल (१०.२६ ओडी) १.८ मि.ली. किंवा क्लोरअँट्रानीलीप्रोल (१८.५ एससी) ०.३ मि.ली. किंवा टोल्फेनपायरॅड (१५ ईसी) २ मि.ली. किंवा फ्लोनिकामीड (५० डब्ल्यूजी) ०.४ ग्रॅम अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मिली प्रतिलिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी.<br>(पावसाची उघडीप असताना फवारणी करावी) |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **आंबा** | | वाढ नियंत्रकाचा वापर करताना घ्यावयाची काळजी<br>पॅक्लोब्युट्राझॉल देण्यापूर्वी व दिल्यानंतर झाडाभोवती उगवलेल्या तणांचा, झुडुपांचा नाश करावा. कारण गवत व झुडुपांच्या मुळांचा पॅक्लोब्युट्राझॉलशी संपर्क आल्यास त्यांच्या मुळांमार्फत पॅक्लोब्युट्राझॉल शोषले जाते. त्यामुळे आंब्याच्या झाडांना अपुरी मात्रा मिळते. यामुळे अपेक्षित परिणाम दिसून येत नाही.<br>पॅक्लोब्युट्राझॉल दिल्यानंतर तीन ते चार महिन्यांनी झाडाला मोहोर येण्यास सुरुवात होते. अशा मोहोराचे कीड व रोगांपासून संरक्षण करावे.<br>पॅक्लोब्युट्राझॉल दिलेल्या झाडापासून दरवर्षी अपेक्षित उत्पादनानुसार खतांच्या वाढीव मात्रा सेंद्रिय आणि रासायनिक खताच्या स्वरुपात सम प्रमाणात द्याव्यात.<br>अशक्त झाडांना पॅक्लोब्युट्राझॉल देऊ नये.<br>पावसाची तीव्रता अधिक असलेल्या दिवसांत पॅक्लोब्युट्राझॉल देऊ नये.<br>आंबा लागवडीमध्ये सुरवातीच्या काळात उत्पादन मिळण्यासाठी नाचणी, वरई, तीळ, भुईमूग, भाजीपाला, कंदपिके इत्यादींची लागवड करता येते. |
| **कांदा** | **रोपवाटिका व्यवस्थापन** | पाण्याची उपलब्धता असलेल्या किंवा वाफश्यावर पेरलेल्या ४ ते ५ आठवड्यांच्या रोपवाटिकेत पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी तसेच जास्तीचे पाणी काढून टाकण्याची व्यवस्था (पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य पध्दतीने चर काढावेत) करावी. मर रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोनवेळेस आळवणी करावी.<br>एक एकर कांदा लागवडीसाठी २ गुंठे  क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. एक एकर लागवडीसाठी २-३ किलो बी पुरेसे होते. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझीम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हीरिडी वापरून जमिनीत मिसळावे. रोपवाटिकेस सुरुवातीला झारीने पाणी द्यावे, नंतर पाटपाणी दिले तरी चालू शकते. रोपवाटिकेत ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धती वापरण्यासाठी जमिनीपासून १०-१५ सें.मी. उंच, १-१.२ मीटर रुंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. त्यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते. पाणी फार काळ साचून राहत नाही, त्यामुळे रोपे कुजत किंवा सडत नाहीत. तसेच लावणीच्या वेळी रोपे सहज उपटून काढता येतात. रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम पालाश प्रति २०० वर्ग मीटर याप्रमाणात खते द्यावीत. रुंदीशी समांतर ५-७.५ सें. मी. अंतरावर रेघा पाडून १-१.५ सें. मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकावे. नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पध्दतीने पाणी द्यावे. तण नियंत्रणासाठी रोपे उगण्यापुर्वी वाफ्यावर पेंडीमिथॅलीन २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून, ८०० ग्रॅम प्रति २०० वर्ग मीटर या प्रमाणात नत्र द्यावे. |
| **टोमॅटो** | **पुनर्लागवड** | पावसाळी टोमॅटो पुनर्लागवड<br>शेतामध्ये सऱ्या पाडून जमिनीच्या उतारानुसार वाफे तयार करून घ्यावेत. टोमॅटोची रोपे तयार झाल्यानंतर लागवडीच्या वाफ्यांना आठवड्यापूर्वी पाणी देऊन वाफसा स्थिती ठेवावी. लागवडीच्या दिवशी वाफ्यांना पुन्हा पाणी द्यावे. वाफ्यांमध्ये पाणी असतानाच ओल्यातच रोपांची लागवड करावी.<br>पुनर्लागवडीपूर्वी रोपवाटिकेमध्ये साधारणतः एक आठवडा अगोदर पाण्याची मात्रा हळूहळू कमी करावी. म्हणजे रोपे कणखर होतात.<br>लागवडीसाठी वाफ्यातून रोपे काढण्यापूर्वी एक दिवस आधी वाफ्यांना पाणी द्यावे. त्यामुळे रोपांची मुळे न तुटता रोपे सहज निघतात.<br>पुनर्लागवडीसाठी २५ ते ३० दिवसांची, १० ते १५ सें.मी. उंच व साधारण ६ ते ८ पाने असलेली रोपे निवडावीत.<br>लागवडीसाठी योग्य वाढीची सशक्त रोपे निवडावीत. मरगळलेली, इजा झालेली, मुळे कमी असणारी, वाकडे व पातळ खोड असणारी तसेच रोगट रोपे पुनर्लागवडीसाठी वापरु नयेत.<br>पुनर्लागवडीपूर्वी रोपांची मुळे इमिडाक्लोप्रिड (१७.८ एसएल) ४ मि.ली. अधिक मेटॅलॅक्झिल एम (३१.८ इएस) ६ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या द्रावणात १०-१५ मिनिटे बुडवून घ्यावीत. नर्सरीमधून आणलेल्या रोपांच्या ट्रेमध्येच वरील द्रावणाची आळवणी करावी. (पावसाची उघडीप असताना फवारणी करावी)<br>दोन रोपांत साधारण ३० सें.मी. आणि सरीत ९० सें.मी. अंतर ठेवून टोमॅटो रोपांची लागवड करावी. रोपे लावताना रोपांच्या खोडावर दाब देऊ नये. नाजूक खोड ताबडतोब पिचल्याने अशी रोपे नंतर दगावतात.<br>लागवडीनंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी आंबवणीचे पाणी द्यावे.<br>लागवडीनंतर दहा दिवसांनी मेलेल्या रोपांच्या जागी नवीन रोपे लावावीत. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **पशुधन (गाय, म्हैस)** | | पशुधनाचे व्यवस्थापन<br>गोठ्यामध्ये काही ठिकाणी पाणी गळत असेल तर वेळीच डागडुजी करावी. गोठ्यात हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी.<br>गोठ्यामध्ये स्वच्छता ठेवावी, जेणेकरून लघवी व शेणावाटे निघणारे अमोनियाए मिथेन वायूमुळे जनावरांच्या डोळ्यांना त्रास होणार नाही.<br>वारा, थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य निवारा, गाभण गाई, म्हशींची योग्य व्यवस्था, आरामदायी व उबदार बसण्याची सुविधा तसेच शक्य तेवढे कोरडे वातावरण या काळात ठेवावे.<br>पावसाळ्यात जमीन ओली, भुसभुशीत झाल्यामुळे जनावर घसरून त्यांना इजा होऊ शकते. दगड व माती खुरांमध्ये जाऊन बसल्यामुळे जनावरांना जखमा होतात. यासाठी खुरांची नियमित तपासणी करावी. पावसाळ्यात ओलसरपणामुळे खूर खराब झाल्यास त्या वेदनांमुळे दुभत्या गाई, म्हशींच्या उत्पादनावर परिणाम होतो.<br>हिरव्या चाऱ्याकरिता ज्वारी, बाजरी, मका, यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याचबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथीघास यासारखी पिके घ्यावीत. |
| **शेळी** | | जुलै व ऑगस्टमधील शेळ्यांतील व्यवस्थापन<br>शरीरावरील परजीवींच्या वाढीकडे लक्ष द्यावे.<br>नवीन करडांचे जंतनिर्मूलन करावे.<br>सर्व शेळ्यांचे आंत्रविषार, पी.पी.आर., धनुर्वातसाठी लसीकरण करून घ्यावे.<br>पैदासक्षम शेळ्यांना खुराक वाढवा.<br>पैदाशीच्या बोकडांची पैदाशीसाठी तयारी करावी. जर एकावेळी शेळ्यांना गाभ घालायचे असेल तर माज ओळखण्यासाठी 'माज ओळखणारा बोकड' (Teaser Buck) गोठ्यात ठेवावा. |
| **मेंढी** | | जुलैमधील मेंढयांतील व्यवस्थापन<br>पशुवैद्यकाच्या सल्ल्याने कळपातील मेंढ्यांची लाल लघवीचा आजार व कावीळ या रोगाची तपासणी करून उपचार करावे.<br>मेंढ्यांना शिफारशीनुसार जंताचे औषध उपचार करावेत.<br>गाभण मेंढ्यांची विशेष काळजी घ्यावी.<br>९ ते १२ महिने वयाच्या कोकरांचे शारीरिक वजन घ्यावे.<br>सर्व मेंढ्यांना धनुर्वात रोगाचे लसीकरण करून घ्यावे. |
| **कुक्कुटपालन** | | पिण्याचे पाणी<br>पावसाळ्यात पाणी दूषित होण्याची शक्यता जास्त असते. कोंबड्यांना अशुद्ध पाणी दिले तर निरनिराळ्या आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. पिण्याच्या पाण्यामध्ये क्लोरिन किंवा ब्लिचिंग पावडर यांसारखी जंतुनाशके योग्य प्रमाणात मिसळावीत. पाण्याची टाकी लोखंडी असल्यास ती गंजू नये म्हणून आतून व बाहेरून रेड ऑक्साइड लावावे. टाकी सिमेंट विटांनी बांधलेली असेल तर आतून व बाहेरून अधूनमधून चुना लावावा. पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे झाकण उघडे असू नये. अन्यथा पावसाचे पाणी टाकीत जाऊ शकते, त्यापासून कोंबड्यांना बाधा होऊ शकते. |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी

**दिनांक** : ०८.०७.२०२५

**स्वाक्षरीत/-**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**

**तथा सहयोगी संशोधन संचालक,**

**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**